Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

Original Article

उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास आणि वक्तशीरपणा यातील सहसंबंधाचा अभ्यास

डॉ. नरेंद्र गि. पाचपांडे
सहयोगी प्राध्यापक, एनपीएस शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अमळनेर (महाराष्ट्र)

Manuscript ID:
JRD -2026-180717
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 7
Pp. 80-83
July- 2026
Submitted: 15 June. 2026
Revised: 25 June. 2026
Accepted: 10 July. 2026
Published: 31 July. 2026

सारांश

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास आणि वक्तशीरपणा यातील सहसंबंधाचा अभ्यास केला आहे. या संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. या संशोधनातील निष्कर्ष असा आहे की, उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थिनी मधील आत्मविश्वास व वक्तशीरपणा यांच्यात धनात्मक सहसंबंध आहे.

मुख्य शब्द: *आत्मविश्वास, वक्तशीरपणा.*

प्रास्ताविक:

एकविसाव्या शतकातील दैनंदिन जीवन फारच गतिमान आहे. विविध क्षेत्रातील संशोधनामुळे ज्ञानाचे विविध क्षेत्र विकसित होत आहेत. यामुळे जीवनात स्पर्धात्मकता निर्माण झाली आहे. रोजच नवनवीन ज्ञान अद्ययावत होत आहे. अशा स्थितीत मानवाला जीवनात टिकून राहावयाचे असेल तर त्याच्यामध्ये क्रियाशीलता, आत्मविश्वास असणे गरजेचे आहे. त्याकरिता त्यांच्यामध्ये वक्तशीरपणा सुद्धा असणे अत्यंत गरजेचे आहे, भारतीय शिक्षण प्रणाली मध्ये व्यक्ती टप्प्याटप्प्याने शिक्षण घेत असतो. पूर्व प्राथमिक, प्राथमिक पूर्व माध्यमिक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक नंतर उच्च शिक्षण या सर्व टप्प्यांचा विचार केला तर उच्च माध्यमिक स्तर हा विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या दृष्टिकोनातून फारच महत्त्वाचा टप्पा आहे या टप्प्यातील शिक्षणातूनच त्यांची भविष्यकाळातील शिक्षण घेण्याची दिशा ठरते. या काळात विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टिकोनातून त्यांच्या पालकांची इच्छा अशी असते की आपल्या पाल्याने जास्तीत जास्त उच्च पातळीचे शिक्षण घ्यावे. वक्तशीरपणा हा एक महत्वपूर्ण शिष्टाचार आहे. जो व्यक्तीला त्याचे कार्य वेळेवर पूर्ण करण्यास प्रोत्साहित करतो. यामुळे वेळेचे महत्त्वही व्यक्तीला कळते. व्यक्ती जर वक्तशीर असेल तर तीला वेळेचा आणि इतरांचाही आदर कशाप्रकारे करावा हे नेहमीच कळते. जीवनात विविध कार्यात यश मिळविण्यासाठी वक्तशीरपणा हा एक महत्त्वाचा पैलू आहे. हा पैलू वेळेला समजून घेऊन तिचे मूल्य जाणतो त्यामुळे तो सहजपणे वक्तशीर व्यक्ती बनू शकतो. शैक्षणिक जीवनात विद्यार्थ्यासाठी, वक्तशीरपणा ही एक शिस्त आणि प्रामाणिकपणाची पायरी आहे. शालेय जीवनात विविध प्रकारचे अभ्यासक्रम व उपक्रमात यश मिळविण्यासाठी विद्यार्थ्याने वक्तशीर असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वक्तशीरपणाचा हा गुण विद्यार्थ्यांना अधिक शिस्तप्रिय आणि जबाबदार बनवतो. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये वक्तशीरपणाचे विशिष्ट स्थान आहे. वक्तशीरपणामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक जीवनात योग्य संतुलन साधता येते. तसेच विद्यार्थ्यांमध्ये स्तरीय सुरक्षितता आणि आत्मविश्वास निर्माण होतो. उच्च माध्यमिक स्तरातील विद्यार्थी अत्यंत संवेदनशील असल्यामुळे त्याची विचार करण्याची पद्धत व सवय त्याला भविष्यात येणाऱ्या अडीअडचणींना सामोरे जाण्यासाठी उपयुक्त असते. शिक्षणाचे टप्पे पार करीत असताना वेगवेगळ्या प्रकारची आव्हाने विद्यार्थ्यांसमोर येतात. सभोवतालच्या जीवनात प्रत्येक विद्यार्थ्याला जीवन जगण्यासाठी ज्या मूलभूत गरजांची आवश्यकता असते त्या पूर्ण होतीलच याची खात्री फारच कमी असते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. नरेंद्र गि. पाचपांडे सहयोगी प्राध्यापक, एनपीएस शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अमळनेर (महाराष्ट्र)

How to cite this article:
पाचपांडे, नरेंद्र. गि. (2026). उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास आणि वक्तशीरपणा यातील सहसंबंधाचा अभ्यास. Journal of Research and Development, 18(7), 80–83.
https://doi.org/10.5281/zenodo.21942144

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21942144
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

यामुळे उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना अनेक छोट्या-मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये वक्तशीरपणा व आत्मविश्वास असल्यास तो येणाऱ्या सर्व समस्यांना चांगल्या प्रकारे सामोरे जाऊन परीक्षेतील स्वतःची प्रगती टिकवून ठेवतो. अशावेळी जे विद्यार्थी वेळेचे महत्व जाणतात वेळेचे योग्य नियोजन करतात त्यांच्या समस्येचे निराकरण यशस्वीपणे होऊन ते प्रगतीकडे वाटचाल करतात. याकरिता विद्यार्थ्यांमध्ये वेळच्या वेळी शैक्षणिक कामकाज इतर कृती करण्याची सवय जडली तर ते अधिक चांगल्या प्रकारे स्वतःची शैक्षणिक प्रगती करू शकतात.

गरज:

वर्तमान काळ हा विज्ञान व तंत्रज्ञान प्रगतीचा आहे. वेगवेगळ्या तंत्रज्ञानाने विविध ज्ञान शाखा उदयास आलेल्या आहेत. या विविध शाखांमध्ये प्रवेश घेण्यासाठी उच्च माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये परीक्षेत जास्तीत जास्त प्राविण्य संपादन करण्याची धडपड सुरू असते. उच्च माध्यमिक स्तरावर मिळणाऱ्या किंवा होणाऱ्या संपादणुकीवरच विद्यार्थ्यांचे भावी जीवन ठरत असते. त्याकरिता या स्तरावर गुण प्राप्त करण्याची स्पर्धात्मकता असते. याकरिता विद्यार्थ्यांमध्ये वक्तशीरपणा व आत्मविश्वास असणे गरजेचे आहे. त्याकरिता वक्तशीरपणा व आत्मविश्वास यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाची गरज आहे.

महत्व:

विद्यार्थ्यांना भावी शिक्षणाच्या प्रवेशा प्रवेशद्वारापर्यंत नेणारा उच्च माध्यमिक शिक्षणाचा हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा आहे. या टप्प्यावर विद्यार्थ्याला मिळणाऱ्या गुणांवरच त्याची भावी शिक्षणाची दिशा ठरते. या संशोधनातून उच्च माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वक्तशीरपणा यांच्यात असलेल्या सहसंबंधाबाबत माहिती मिळवता येईल.

उद्दिष्टे:

१. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे आत्मविश्वास मापिकेत मिळणारे गुणांक आणि वक्तशीरपणा मापिकेत मिळणारे गुणांक यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

२. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनींचे आत्मविश्वास मापिकेत मिळणारे गुणांक आणि वक्तशीरपणा मापिकेत मिळणारे गुणांक यातील सहसंबंधांचा अभ्यास करणे.

3. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे आत्मविश्वास मापिकेत मिळणारे गुणांक व वक्तशीरपणा मापिकेत मिळणारे गुणांक यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

गृहीते:

१. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी आत्मविश्वास या घटकाविषयी परिचित आहेत.

२. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी वक्तशीरपणा या संकल्पनेविषयी परिचित आहेत.

शुन्य परिकल्पना:

१. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे आत्मविश्वास मापिकेत मिळणारे गुणांक आणि वक्तशीरपणा मापिकेत मिळणारे गुणांक यात सार्थ सहसंबंध नसतो.

२. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनींचे आत्मविश्वास मापिकेत मिळणारे गुणांक आणि वक्तशीरपणा मापिकेत मिळणारे गुणांक यात सार्थ सहसंबंध नसतो.

3. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थिनींचे आत्मविश्वास मापिकेत मिळणारे गुणांक व वक्तशीरपणा मापिकेत मिळणारे गुणांक यात सार्थ सहसंबंध नसतो.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर माहिती संकलनासाठी केला आहे.

न्यादर्श:

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने नमुना निवड केलेली आहे. जळगाव येथील उच्च माध्यमिक महाविद्यालयातील 94 विद्यार्थ्यांची निवड न्यादर्श म्हणून करण्यात आली आहे.

संशोधन साधने:

प्रस्तुत संशोधनासाठी उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचे मापन करण्यासाठी १. डॉ. रेखा गुप्ता यांच्या प्रामाणित आत्मविश्वास मापिकेचा वापर करण्यात आला आहे. २. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने वक्तशीरपणाचे मापन करण्यासाठी क्यू. जी. आलम आणि रामजी श्रीवास्तव यांनी प्रमाणित केलेल्या वक्तशीर मापिकेचा वापर केला आहे.

परिकल्पना परीक्षण (०.०५ स्तर):

शून्य परिकल्पना क्रमांक १:

उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे आत्मविश्वास मापिकेत मिळणारे गुणांक आणि वक्तशीरपणा मापिकेत मिळणारे गुणांक याचा सार्थ सहसंबंध नसतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

तक्ता क्रमांक: १

चले	N	प्राप्त r	Df	सार्थकता स्तर	टेबल r मूल्य	प्राप्त r व नमूना r तुलना	सार्थकता
आत्मविश्वास मापिकेत मिळालेले गुणांक व वक्तशीरपणा मापिकेत मिळालेले गुणांक	४७	०.६३०	४५	०.०५	०.२८७	प्राप्त r मूल्य > टेबल r मूल्य	सार्थक

तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविल्यानुसार उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना आत्मविश्वास मापिकेत मिळालेले गुणांक आणि वक्तशीरपणा मापिकेत मिळालेले गुणांक यांच्यातील सहसंबंध गुणक r + ०.६३० आला. म्हणजेच दोन चलांमधील संबंध चांगला व धन स्वरूपाचा आहे.

सार्थकता स्तर ०.०५ करिता ४५ या स्वाधीनता मात्रेसाठी सारणी वरून r चे मूल्य ०.२८७ आले. म्हणून प्राप्त r (०.६३०) हा सारणी r (०.२८७) त्या मूल्यापेक्षा जास्त आहे. यावरून दोन चलांमधील गुणाकारांमध्ये आढळून आलेला संबंध सार्थ आहे.

शुन्य परिकल्पना क्रमांक २ (०.०५ स्तर)

उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनींचे आत्मविश्वास मापिकेत मिळणारे गुणांक आणि वक्तशीरपणा मापिकेत मिळणारे गुणांक यात सार्थ सहसंबंध नसतो.

तक्ता क्रमांक २

चले	N	प्राप्त r	Df	सार्थकता स्तर	टेबल r मूल्य	प्राप्त r व नमूना r तुलना	सार्थकता
आत्मविश्वास मापिकेत मिळालेले गुणांक व वक्तशीरपणा मापिकेत मिळालेले गुणांक	४७	०.७२१	४५	०.०५	०.२८७	प्राप्त r मूल्य > टेबल r मूल्य	सार्थक

तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शविल्यानुसार उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनींना आत्मविश्वास मापिकेत मिळालेले गुणांक आणि वक्तशीरपणा मापिकेत मिळालेले गुणांक यांच्यातील सहसंबंध गुणक (r) + ०.७२१ आला. यावरून दोन चलांमधील संबंध चांगला व धन स्वरूपाचा आहे.

सार्थकता स्तर ०.०५ करिता ४५ या स्वाधीनता मात्रेसाठी सारणी वरून r चे मूल्य ०.२८७ आले. म्हणून प्राप्त r (०.७२१) हा सारणी r (०.२८७) च्या मूल्यापेक्षा जास्त आहे. यावरून दोन चलांमधील गुणाकारांमध्ये असलेला संबंध सार्थ आहे.

शून्य परिकल्पना क्रमांक ०३:

उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थिनींचे आत्मविश्वास मापिकेत मिळणारे गुणांक आणि वक्तशीरपणा मापिकेत मिळणारे गुणांक यात सार्थ संबंध नसतो.

तक्ता क्रमांक ३

चले	N	प्राप्त r	Df	सार्थकता स्तर	टेबल r मूल्य	प्राप्त r व नमूना r तुलना	सार्थकता
आत्मविश्वास मापिकेत मिळालेले गुणांक व वक्तशीरपणा मापिकेत मिळालेले गुणांक	९४	०.७५१	९२	०.०५	०.२०४	प्राप्त r मूल्य > टेबल r मूल्य	सार्थक

तक्ता क्रमांक ३ मध्ये दर्शविल्यानुसार उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थिनींना आत्मविश्वास मापिकेत मिळालेले गुणांक व वक्तशीरपणा मापिकेत मिळालेले गुणांक यातील सहसंबंध गुणक (r) ०.७५१ आला. यावरून दोन चलांमधील संबंध चांगला व धन स्वरूपाचा आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

सार्थकता स्तर ०.०५ करिता ९२ या स्वाधीनता मात्रेसाठी सारणी वरून r चे मूल्य ०.२०४ आले. म्हणून प्राप्त r (०.७५१) हा सारणी r (०.२०४) च्या मूल्यापेक्षा जास्त आहे. यावरून दोन चलांमधील गुणाकारांमध्ये असलेला संबंध सार्थक आहे. याचा अर्थ दोन चलांमधील गुणांकामध्ये असलेला संबंध सार्थक आहे.

निष्कर्ष:

१. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास व वक्तशीरपणा यात सार्थ सहसंबंध असतो.

2. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थिनी मधील आत्मविश्वास आणि वक्तशीरपणा यात सार्थ सहसंबंध असतो.

3. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थिनी मधील आत्मविश्वास व वक्तशीरपणा यात सार्थ सहसंबंध आहे.

प्रस्तुत संशोधनावरून असे निर्देशनास आले की, उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये वक्तशीरपणा आणि आत्मविश्वास यांच्या बाबतीत सकारात्मक सहसंबंध आहे. उच्च माध्यमिक स्तरात विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या यशावर त्यांचे भवितव्य अवलंबून असते. त्याकरिता शिक्षक, पालकांनी त्यांचा वक्तशीरपणा व आत्मविश्वास टिकून राहील याकडे लक्ष द्यावे.

संदर्भ:

1. Roland Benabou and Jean Triole (2001). Self-confidence and personal motivation- www.princeton.edu.
2. Madison Vander Wielen (2016). The Relationship Between Punctuality, Optimism and Time Perception Undergraduate Psychology Research Methods Journal. Vol. 1 issue 18.
3. Venkataraman S and Senthilkumar K (2021). A Review study on Self-confidence of School students- International Journal of Scientific Development and Research. Sept 2021, Vol. 6 issue9.
4. Hardika P. Mehta and Dr. Vaishaliben H. Panchal (2020). Self-confidence of public and private school students, The International Journal of Indian Psychology. Vol. 18 issue 4.
5. Sophia Baloyi and Zeleke Worku (2022). The relationship between punctuality and improved academic performance in public schools. International Journal of Applied Science and Research. Vol. 5 issue4